॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon )
1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र. : कबचौउमवि/७-अ/२९ वा दी.स./८९३ /२०२१ दि. २७ /०४/२०२१

**प्रति,**
**गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्रदान**
**करण्यासाठी देणगी देणारे**
**सन्माननीय देणगीदार.**

**विषय :** विद्यापीठाच्या एकोणतिसाव्या दीक्षांत समारंभास ऑनलाईन उपस्थित राहणेबाबत.

महोदय/महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा एकोणत्तीसावा दीक्षांत समारंभ **माननीय श्री. भगतसिंह कोश्यारी, मा. राज्यपाल तथा कुलपती महोदयांच्या अध्यक्षतेखाली** सोमवार, दिनांक ०३ मे, २०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या अधिसभागृहात ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात आला असून, मा.राज्यपाल तथा कुलापती महोदय या समारंभात ऑनलाईन सहभागी होऊन दीक्षांत भाषण करणार आहेत.

तसेच प्रमुख पाहुणे म्हणून **नामदार उदय सामंत, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री (महाराष्ट्र राज्य)** हे ऑनलाईन सहभागी होणार आहेत.

आपण, गुणवंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी सुवर्ण पदक देण्याकरीता देणगी दिली, त्याबद्दल विद्यापीठ आपले आभारी आहे. आपण दिलेल्या देणगीतून पात्र गुणवंत विद्यार्थ्यास एकोणत्तीसाव्या दीक्षांत समारंभात सुवर्णपदक देण्याचे जाहीर केलेले असून, सुवर्णपदकासाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

कोव्हीड-१९ चा प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या दीक्षांत समारंभात सुवर्णपदक प्रत्यक्ष प्रदान केली जाणार नसून, दीक्षांत समारंभानंतर सुवर्ण पदक प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून यथावकाश कळविण्यात येणार आहे.

दीक्षांत समारंभ हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्वाचा क्षण असतो सोमवार,दि.०३ मे,२०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता या दीक्षांत समारंभाचे थेट प्रक्षेपण nmu.ac.in या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या लिंकद्वारे करण्यात येणार असून, आपण या लिंकद्वारे ऑनलाईन सहभागी व्हावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

**(भ.प्र.पाटील)**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**